आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्पर्धेमधील महाराष्ट्र राज्यातील पदक प्राप्त खेळाडू व त्यांच्या मार्गदर्शकांना रोख पारितोषिक देऊन गौरविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक: SD-१२०१२/१३/२०२६(१७६४७३६)/क्रीयुसे-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १८ ऑगस्ट, २०२६

वाचा:

१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : क्रीडाधो- २०११ / प्र.क्र.५५/११/क्रीयुसे -१, दि.१४.०६.२०१२.
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : राक्रीधो-२०१२ / प्र.क्र १५८/१२/क्रीयुसे - २, दि.०५.०२.२०१४.
३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : राक्रीधो-३६२४/प्र.क्र.५९/क्रीयुसे-२, दि.०७.१०.२०२४
४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : राक्रीधो-३६२४/प्र.क्र.५९/क्रीयुसे-२, दि.१५.१०.२०२४
५) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांचे पत्र क्र. रोख बक्षीस/प्रस्ताव निर्णय/२०२६-२७/का-६/१२६३, दि.१७.०६.२०२६
६) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांचे पत्र क्र. रोख बक्षीस/प्रस्ताव निर्णय/२०२६-२७/का-६/२४६३, दि.११.०८.२०२६

प्रस्तावना-

राज्यातील क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक आहे. याच भूमिकेतून राज्याचे क्रीडा धोरण, २०१२ घोषित करण्यात आले आहे. त्याची अंमलबजावणी करण्यास वाचा येथील क्र. १ मधील दि.१४.०६.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण, २०१२ अंतर्गत आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केलेल्या तसेच राज्याचे नाव उज्ज्वल करणा-या पदक प्राप्त खेळाडू व त्यांच्या मार्गदर्शकांना रोख पारितोषिक देऊन गौरविण्याची योजना वाचा येथील क्र. २ मधील दि.०५.०२.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यन्वित आहे. ऑलिम्पिक/पॅरा ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा व आशियाई/पॅरा आशियाई क्रीडा स्पर्धा तसेच राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पदक विजेत्या खेळाडूंना इतर राज्यांमार्फत भरघोस मदत दिली जाते. त्याच धर्तीवर आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कार्य करुन राज्याचे नाव उज्ज्वल करणाऱ्या खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी वाचा येथील क्र. ३ व ४ मधील शासन निर्णयान्वये वेळोवेळी सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करुन

राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या महाराष्ट्र राज्यातील पदक प्राप्त खेळाडू व त्यांच्या मार्गदर्शकांना रोख पारितोषिक देण्याच्या अनुषंगाने आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांनी उपरोक्त दिनांक १७.०६.२०२६ व सुधारीत प्रस्ताव दिनांक ११.०८.२०२६ अन्वये शासनास प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करुन राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या महाराष्ट्र राज्यातील पदक प्राप्त खेळाडू व त्यांच्या मार्गदर्शकांना रोख पारितोषिक देऊन गौरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करुन राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या महाराष्ट्र राज्यातील पदक प्राप्त खेळाडू व त्यांच्या मार्गदर्शकांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेली रक्कम रोख पारितोषिक म्हणून मंजूर करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे-:

अ. क्र.	खेळाडूचे नाव व पत्ता	खेळ	स्पर्धा	प्राविण्य	सहभागी देश संख्या	प्रस्तावित रक्कम (लाखात)	
						खेळाडू	मार्गदर्शक
१	यशदीप संजय भोगे, अमरावती	धनुर्विद्या	२४ वी एशियन धनुर्विद्या अजिंक्यपद स्पर्धा २०२५ ढाका, बांग्लादेश दि. ७ ते १५ नोव्हेंबर २०२५	रिकर्व सांघिक सुवर्ण	१५	५२.५०	५.२५
२	प्रिथिका प्रदीप	धनुर्विद्या	२४ वी एशियन धनुर्विद्या अजिंक्यपद स्पर्धा २०२५ ढाका, बांग्लादेश, दि. ७ ते १५ नोव्हेंबर २०२५	सांघिक- सुवर्ण (कंपाउंड महिला आर्चरी संघ)	८	५२.५०	५.२५
			२४ वी एशियन धनुर्विद्या अजिंक्यपद स्पर्धा २०२५ ढाका, बांग्लादेश, दि. ७ ते १५ नोव्हेंबर २०२५	वैयक्तिक- रौप्य (कंपाउंड आर्चरी)	१७	५०.००	५.००
३	साहिल राजेश जाधव	धनुर्विद्या	२४ वी एशियन धनुर्विद्या अजिंक्यपद स्पर्धा २०२५ ढाका,बांग्लादेश, दि. ७ ते १५ नोव्हेंबर २०२५	सांघिक रौप्य (कंपाउंड पुरुष आर्चरी संघ)	१३	३७.५०	३.७५

४	सुकान्त इंदुकांत कदम, पुणे	पॅरा बॅडमिंटन	पॅरा बॅडमिंटन वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२६, मनामा, बहराईन, ८ ते १४ फेब्रुवारी २०२६	वैयक्तिक- कांस्य (MS-SL४)	१०	१००.००	१०.००
				सांघिक - सुवर्ण (MD-SL३-SL४)	१०	२२५.००	२२.५०
५	प्रेम कुमार आले, पुणे	पॅरा बॅडमिंटन	पॅरा बॅडमिंटन वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२६, मनामा, बहराईन, २० ते २४ फेब्रुवारी २०२६	सांघिक - रौप्य (XD-WH१-WH२)	८	१५०.००	१५.००
६	मानसी जोशी, मुंबई	पॅरा बॅडमिंटन	पॅरा बॅडमिंटन वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२६, मनामा, बहराईन, ८ ते १४ फेब्रुवारी २०२६	WOMENS DOUBLES - कांस्य (WD-SL३-SU५)	९	७५.००	७.५०
७	आर्या राजेश बोरसे,नाशिक	शूटिंग	ISSF विश्वचषक (रायफल/पिस्तूल), म्युनिक, जर्मनी, ८ ते १५ जून २०२५	सांघिक - सुवर्ण (१० M. Air Rifle Mix Team gold medal)	३६	२२५.००	२२.५०
८	आनिका विवेक दुबे, पुणे	स्क्वॉश	२२ व्या आशियाई कनिष्ठ स्क्वॅश सांघिक अजिंक्यपद स्पर्धा, हॉंगकॉंग, चीन. १२ ते १६ फेब्रुवारी २०२५	सांघिक - कांस्य	११	७.५०	०.७५
			३२ वी आशियाई कनिष्ठ वैयक्तिक स्क्वॉश चॅम्पियनशिप,	वैयक्तिक - कांस्य			

			गिमिओन, दक्षिण कोरिया. १ ते ५ जुलै २०२५		१२	१०.००	१.००
९	रुद्रांक्ष बाळासाहेब पाटील	शूटिंग	एशियन अजिंक्यपद स्पर्धा, न्यू दिल्ली, ०२ ते १४ फेब्रुवारी २०२६.	वैयक्तिक सुवर्ण (१०मीटर एयर रायफल पुरुष वैयक्तिक)	८	७०.००	७.००
१०	प्रथमेश भालचंद्र फुगे, पुणे	धनुर्विद्या	२४ वी एशियन धनुर्विद्या अजिंक्यपद स्पर्धा २०२५ ढाका,बांग्लादेश, दि. ७ ते १५ नोव्हेंबर २०२५	कम्पाऊंड सांघिक रौप्य पदक	१३	३७.५०	३.७५
११	शांभवी श्रावण शीरसागर	शूटिंग	ISSF ज्युनिअर वर्ल्ड कप, न्यू दिल्ली, इंडिया. दि. २४ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोंबर २०२५	वैयक्तिक - कांस्य (१०मीटर एयर रायफल महिला ज्युनिअर)	८	१०.००	१.००
			ISSF ज्युनिअर वर्ल्ड कप, जर्मनी. दि. १९ ते २७ मे २०२५	सांघिक - कांस्य (१० मीटर एयर रायफल मिश्र संघ ज्युनिअर)	२४	७.५०	००.७५
			ISSF ज्युनिअर वर्ल्ड कप, जर्मनी. दि. १९ मे ते २७ मे २०२५	वैयक्तिक - सुवर्ण (१० मीटर एयर रायफल महिला ज्युनिअर)	३३	३०.००	३.००

१२	सूर्यकुमार यादव	क्रिकेट	आयसीसी टी- २० क्रिकेट वर्ल्ड कप २०२६	सांघिक सुवर्ण	२०	२२५.००	२२.५०
१३	शिवम दुबे	क्रिकेट	आयसीसी टी- २० क्रिकेट वर्ल्ड कप २०२६	सांघिक सुवर्ण	२०	२२५.००	२२.५०
१४	दिलीप गावित	पॅरा-ॲथलेटिक्स	राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा ग्लासगो, स्कॉटलंड दि. २३ जुलै ते २ ऑगस्ट, २०२६	सुवर्णपदक १०० मी. (T४७)	०७	१००.००	१०.००
१५	सर्वेश कुशारे	ॲथलेटिक्स	राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा ग्लासगो, स्कॉटलंड दि. २३ जुलै ते २ ऑगस्ट, २०२६	रौप्यपदक उंच उडी (High Jump)	१४	७५.००	७.५०
	एकूण रक्कम					**१७६५.००**	**१७६.५०**
	एकूण (अक्षरी रूपये एकोणावीस कोटी एकेचाळीस लक्ष पंन्नास हजार फक्त)					**१९४१.५०**	

उपरोक्त नुसार एकूण **रु.१९४१.५० (रूपये एकोणावीस कोटी एकेचाळीस लक्ष पंन्नास हजार फक्त)** इतकी रक्कम आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिनस्त ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३. उपरोक्त बाबीकरीता होणारा खर्च "मागणी क्रमांक ई-३,२२०४- क्रीडा व युवक सेवा १०४ क्रीडा व खेळ (०९) (०६) ऑलिम्पिक, राष्ट्रकुल व आशियाई स्पर्धांमधील पदक विजेत्यांना रोख पारितोषिक देणे (२२०४-५३२१)- ५० इतर खर्च” या लेखाशीर्षाखालील सन २०२६-२७ मधील अर्थसंकल्पित तरतूदीमधून भागविण्यात यावा.

४. i. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

ii. उपरोक्त निधी आवश्यकतेनुसार व मान्य निकषानुसार खर्च करण्यात यावा. ज्यावेळेस निधी प्रत्यक्ष खर्च करावयाचा त्याच वेळी आहरित करावा. शासन लेख्याबाहेर बॅक खात्यात हा निधी ठेवू नये.

iii. राज्य शासनामार्फत वेळोवेळी वित्त विषयक निर्गमित करण्यात आलेले विविध आदेश /नियम / शासन निर्णय, वित्तीय नियमावली इत्यादीच्या अधीन राहून उपरोक्त तरतुद वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

iv. उपरोक्त खर्चाचा सविस्तर तपशिल तसेच उपयोगिता प्रमाणपत्र तात्काळ सादर करावे.

v. प्रस्तावित खेळाडू व त्यांचे मार्गदर्शक नियमानुसार रोख परितोषिकासाठी पात्र असल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी आयुक्त, क्रीडा यांची राहील.

५. वित्त विभागाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार वरील निधी खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारीक संदर्भ क्र.४८१/व्यय-५,दि.१९.०७.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१८१२५१२२४०४२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KUNAL PRAKASH SARPATE

Digitally signed by KUNAL PRAKASH SARPATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=E6A1F3D5C3AB992CD9199B6876A0D6ECA093BA0997B95C14B994911065E1850D, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=83650EA2D9A8726AAC3D480F8E9314BAD245DE4B1C4CE60C4CF22C5148EAF108, cn=KUNAL PRAKASH SARPATE
Date: 2026.08.18 12:55:08 +05'30'

(कुणाल सरपाते)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा / विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, मुंबई.
६) मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
७) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) -१/२, महाराष्ट्र , मुंबई/नागपूर.
११) महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१/२,महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१२) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१३) उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१४) उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, (क्रीडा संचालनालयामार्फत)

१५) वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे. (संचालनालयामार्फत)

१६) वित्त विभाग (व्यय-५)/अर्थ-८/नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई-३२.

१७) कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१८) निवड नस्ती (क्रीयुसे-२).